c) समाजशास्त्राची उपयोगिता किंवा महत्त्व :-

Importance of Sociology :- प्रबोधन युगाचा परिणाम आधुनिक विश्वामध्ये शास्त्रीय विचारसरणी सर्वच क्षेत्रांमध्ये निर्माण झाली आहे. परंपरागत साधी राहणीमान संपुष्टात येऊन संपूर्ण विश्व आधुनिक साधनांच्या सहाय्याने परस्परांच्या संपर्कात आलेले आहे. याचा परिणाम अखिल मानव समाज विस्तारित व संकीर्ण बनत चालला आहे. अशावेळी परस्पर संपर्काचे चांगले-वाईट परिणाम दिसून येत आहेत. सहकार्याच्या भावनेऐवजी संघर्ष वाढत चालला आहे. यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक घटनांचा आणि समस्यांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्राची गरज भासू लागली आहे. कारण समाजशास्त्राच्या अध्ययनामुळे मानवी वर्तनामागे दैवी, किंवा ईश्वरी शक्ती नाही याचे आकलन

होऊन सामाजिक घटनांच्या मागील कारणांचा शोध घेता येतो.
यामुळे कोणत्याही समाजाचे शास्त्रीय आकलन होऊन व्यक्तीचे
आपले समायोजन साधता येते. याशिवाय आपण काय करावे?
काय करायचे आहे? याविषयी मार्गदर्शन देखील केले जाते.
समाजशास्त्राची उपयोगिता म्हणजे समाजाचा अभ्यास करून
मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी केला
पाहिजे यादृष्टिने, व्यक्ती, समाज व विद्यार्थी यांच्या दृष्टीने
समाजशास्त्राची उपयोगिता किंवा महत्त्व पुढीलप्रमाणे :-

1) सामाजिक समस्यांचे अध्ययन :-

आजच्या आधुनिक विश्वात
विविध सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. या सर्व
सामाजिक समस्या मानवनिर्मित आहेत. समस्यांचा परिणाम
संपूर्ण समाजावरती घडून येत आहे. अशा समस्यांमुळे सामाजिक
विकासात अडथळे निर्माण होत आहेत. समाजशास्त्रामध्ये सामाजिक
समस्यांचा शास्त्रीय अभ्यास करून त्या सोडवण्यासाठी काही उपाय
सुचविले जातात. समाजव्यवस्था सुव्यवस्थेत ठेवण्यासाठी, समस्या
सोडवण्यासाठी हे उपाय महत्त्वाचे ठरत आहेत. यासाठी मानवाच्या
वर्तनाचा अभ्यास करणाऱ्या समाजशास्त्राची गरज भासत आहे.

2) समाजशास्त्र आणि उद्योग :-

औद्योगिक क्रांतीमुळे कारखाना पद्धत
औद्योगिक समाज, भांडवलशाही व्यवस्थेचा उदय इ. ची निर्मिती झाली
याचे चांगले-वाईट परिणाम समाजावरती घडून आले. औद्योगिकरण
मुळे खेड्यांचे विघटन संयुक्त कुटुंबांचे विघटन घडून आले. शहरीकरण
वाढल्याने त्या ठिकाणी काही समस्या निर्माण झाल्या. कामगार आणि
भांडवलदार यांच्यातील संघर्ष वाढीस लागला. या सर्व परिस्थितीवरती
उपाय शोधण्यासाठी समाजशास्त्राचे अध्ययन उपयुक्त ठरू लागले.
समस्यांचे निर्मूलन, कामगारांचे प्रश्न समजून घेणे, कामगार आणि
मालक यांच्यात समन्वय साधणे यासाठी समाजव्यवस्था आणि
उद्योगधंदे यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास समाजशास्त्रामध्ये
केला जात आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या उद्योगधंदे हे एक सामाजिक
संघटन आहे. त्यामुळे या क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी औद्योगिक

Scanned with CamScanner

समाजशास्त्र (Industrial Sociology) ही नवीन शाखा निर्माण आहे.

3) <u>मानवी समाजाचे वस्तुनिष्ठ अध्ययन</u> :- समाजशास्त्र हे मानवी सामाजिक संबंधांचा अभ्यास करणारे एक स्वतंत्र, सामाजिक शास्त्र आहे. समाजशास्त्रामध्ये मानवी समाजाची संरचना, संरचनेचे घटक, त्यांच्यातील परस्पर संबंध, सामाजिक नियंत्रण, सामाजिक परिवर्तन, सामाजिक विचलन इत्यादी सर्व प्रक्रिया इत्यादी शास्त्रीय पद्धतीने अध्ययन केले जाते. शास्त्रीय अभ्यासामुळे मानवी समाजाचे वस्तुनिष्ठ आकलन होते. योग्य आणि सत्य वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध झाल्याने या माहितीचा उपयोग सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी समाजामध्ये नियोजनबद्ध परिवर्तन करण्यासाठी केला जाऊ शकतो. म्हणजेच मानवी समाजाचे वस्तुनिष्ठ आकलन करून घेण्यासाठी समाजशास्त्र आवश्यक आहे.

४) <u>विचलित वर्तन आणि समाजशास्त्र</u> :- प्रत्येक व्यक्ती सामाजिक जीवन जगत असताना आपल्या गरजांची पूर्तता समाजमान्य मार्गानेच करत असते. मात्र काही व्यक्ती सामाजिक नियमांचे उल्लंघन करतात. नियमनांच्या विरोधात वर्तन करून त्यांचे उल्लंघन करतात. अशा वर्तनास विचलित वर्तन म्हणून ओळखले जाते. व्यक्तीच्या विचलित वर्तनाचा परिणाम अनेक सामाजिक प्रश्न, समस्या निर्माण होतात. उदा. भ्रष्टाचार, दहशतवाद इ.

व्यक्तीच्या विचलित वर्तनाचा परिणाम समाजव्यवस्थेवर होऊन विघटन घडून येते. अशावेळी समाजाचे संघटन टिकवण्यासाठी व्यक्तीच्या विचलित वर्तनाचा अभ्यास करून त्यावरती उपाय सुचवून वर्तनात सुधारणा करणे यासाठी समाजशास्त्रीय अभ्यास महत्त्वाचा ठरत आहे. समाजशास्त्रामध्ये या क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी 'गुन्हेगारी समाजशास्त्र' ही एक स्वतंत्र शाखा निर्माण झालेली. विचलित वर्तन रोखण्यासाठी व त्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी समाजशास्त्रीय अभ्यासाची मदत होत आहे.

Scanned with CamScanner

Page No.
Date: | |

५) सामाजिक कल्याणासाठी उपयुक्त :-

अखिल मानव समाजाचे कल्याण साधण्याच्या दृष्टीने समाजशास्त्राला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. समाजातील सर्व घटकांचा समान विकास होत नाही, काही समूह, समुदाय आजही विकासापासून वंचित आहेत विशेषत: भारतातील आदिवासी अनुसूचित जाती व कामगार महिला, दुर्बल घटक यांच्यासाठीही शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना आहेत. परंतु, नवीन योजना करण्यासाठी यासर्व घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण अशा अभ्यासामुळेच त्यांच्या गरजा, प्रश्न, समोर येऊ शकतात. समाजशास्त्रामध्ये या सर्व घटकांचा अभ्यास होत असल्याने अनेक कल्याणकारी योजना निर्माण करताना त्याचा फायदा होत आहे.

६) सामाजिक नियोजन :-

समाजाचा एका विशिष्ट दिशेने निश्चित विकास करण्यासाठी नियोजन महत्त्वाचे ठरते, आर्थिक नियोजना-बरोबरच सामाजिक नियोजन महत्त्वाचे असते कोणत्याही समाजाचे सामाजिक नियोजन करत असताना त्या समाजाची वस्तुनिष्ठ माहिती, समस्यांची जाणीव, संस्कृतीची ओळख असली पाहिजे. ही ओळख समाजशास्त्राच्या अभ्यासातून होत असल्याने सामाजिक नियोजनाच्या दृष्टीने समाजशास्त्रातील अभ्यास, संशोधन महत्त्वाचे ठरते.

७) सामाजिक, धार्मिक एकता निर्माण करणे :-

संपूर्ण समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व इतर अनेक प्रकारची विविधता दिसून येते. अशा समाजामध्ये सामाजिक, धार्मिक प्रश्नांवरून अनेक वेळा संघर्ष निर्माण होतो त्यासाठी समाजामध्ये सामाजिक, धार्मिक एकता निर्माण करणे महत्त्वाचे आहे. समाजहिताच्या दृष्टीने ते आवश्यक आहे. समाजशास्त्रामध्ये यासर्व घटकांचा अभ्यास केला जातो. याचा उपयोग करून सामाजिक व धार्मिक एकता निर्माण करणे शक्य झाले आहे.

Scanned with CamScanner

1) <u>उपयोजित समाजशास्त्र</u> :-

कोणत्याही शास्त्राकडे शुध्द शास्त्र नसेल उपयोजित शास्त्र या दृष्टिकोनातून (दोन) पाहिले जाते. शुध्द शास्त्रात संबंधित विषयांचे अध्ययन करुन निष्कर्ष मांडले जातात तर या अभ्यासाचे निष्कर्ष कसे व कुठे उपयोगात येतील यावरती उपयोजित शास्त्रांमध्ये सांगितले जाते. समाजशास्त्र हे दोन्ही प्रकारचे शास्त्र असल्याने विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रामध्ये व्यावसायिक संधी उपलब्ध करुन देते. या विषयातून पदवी प्राप्त केल्यानंतर विभिन्न क्षेत्रात जाण्याची संधी उपलब्ध होते हे महत्त्व पुढीलप्रमाणे :-

1) <u>अध्यापनाचे क्षेत्र</u> :-

कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय व विद्यापीठ या शैक्षणिक स्तरावरती समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. यासाठी काही शैक्षणिक अटी पूर्ण कराव्या लागतात. M.A. नंतर B.Ed, UGC मार्फत घेतली जाणारी NET व CET ची परीक्षा M.Phil व Ph.d. या पैकी पदवी प्राप्त केल्यानंतर प्राध्यापक होण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.

2) <u>समाज कार्य</u> :-

समाजशास्त्र विषयातून पदवी प्राप्त केल्यानंतर M.S हा दोन वर्षाचा कोर्स केल्यानंतर शासनाच्या विभिन्न विभाग (समाजकल्याण, महिला व बालकल्याण, Labour officer) आणि अशासकीय संस्था यात नोकरीची संधी उपलब्ध होऊ शकते.

3) <u>प्रशासकीय सेवा</u>:-

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) व महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) यांच्या मार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी ऐच्छिक विषय म्हणून समाजशास्त्र विषय घेता येतो. यामध्ये यश प्राप्त केल्यास केंद्र आणि राज्य स्तरावर

Ph.D.

प्रसार माध्यमातील संधी :-

समाजशास्त्रातून पदवी प्राप्त केल्यानंतर प्रसार माध्यमांसाठी आवश्यक असणारी B.G.C व M.J.C ही पदवी प्राप्त केल्यानंतर वर्तमानपत्रे, दूरचित्रवाणी, आकाशवाणी, मासिके यासारख्या प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात पत्रकार, संपादक, सहसं निवेदक, छायाचित्रकार यासारख्या अनेक पदांवरती काम करण्याची संधी उपलब्ध होते.

५) अशासकीय क्षेत्र :-

समाजामध्ये अनेक क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी अशासकीय संस्था किंवा बिगर शासकीय संस्था निर्माण झालेल्या आहेत अशा संस्था, शिक्षण, समाजकल्याण, आरोग्य, दुर्बल घटकांचा विकास, स्त्रियांचा विकास, आदिवासी विकास, ग्रामीण विकास, पर्यावरणाचे संवर्धन, समस्यांचे निर्मूलन इ. क्षेत्रात काम करत आहेत. अशा संस्था अनेक प्रकल्प हाती घेतात. त्याची अंमलबजावणी करणे, मूल्यमापन करणे यासाठी मनुष्यबळाची गरज लागते. अशाच ठिकाणी आपल्या पात्रतेनुसारच, कौशल्यानुसार विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी मिळू शकते.

व्यक्ती आणि समाज या दोन्ही स्तरावरती समाजशास्त्राचे महत्त्व पटल्याने विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर या विषयाचे अध्ययन व अध्यापन केले जात आहे. विशेषकरुन मानवी समाजाचा वस्तूनिष्ठ अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्राची गरज अधिक भासत आहे.